रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर, संलग्नीत

डॉ. म. वा. पी. डब्ल्यू. एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर.

# राष्ट्रीय सेवा योजना



## अहवाल



## २०१८–२०१९




सादरकर्ते

प्रा. डॉ. नरेंद्र बागडे

रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी

डॉ. म. वा.पी. डब्ल्यू. एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर.

**राष्ट्रीय सेवा योजना समिति**

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. नरेंद्र बागडे | कार्यक्रम अधिकारी |
| प्रा. डॉ. मनीषा नागपुरे | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी |
| प्रा.डॉ. चन्द्रशेखर पाटील | सदस्य |
| प्रा. डॉ. सुदेश भोवते | सदस्य |
| प्रा. डॉ. विमल राठोड | सदस्य |
| प्रा.डॉ. सुशांत चिमणकर | सदस्य |

**राष्ट्रीय सेवा योजना चे मुख्य लक्ष्य खालील प्रमाणे आहेत.**

- ज्या समुदायात विद्यार्थी कार्य करतात त्यांना समजू घेणे.
- स्वत:च्या समुहात संबंधात स्वत:ला समजून घेण.
- समूहाच्या गरजा आणि समस्यांना मान्यता देणे आणि त्यांना समस्या निवारणासाठी प्रयत्न करणे.
- आपापसात सामाजिक व नागरी जबाबदारीची जाणीव विकसित करणे.
- वैयक्तिक आणि सामुहिक समस्यांच्या समस्यासाठी व्यवहारिक उपाय शोधण्यासाठी त्यांचे ज्ञान ओळखणे.
- समूह –जीवन आणि जबाबदाऱ्या सामायिक करणे आवश्यक असलेल्या क्षमता विकसित करणे.
- नेतृत्व गुण आणि लोकशाही दृष्टीकोन विकसित करणे.
- आणीबाणी व नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी क्षमता विकसित करणे.
- राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सलोखाचा अभ्यास करणे.

**राष्ट्रीय सेवा योजना**

**अहवाल २०१८ – २०१९**

## जागतिक पर्यावरण दिवस

पीडब्ल्यूएस सोसायटी द्वारा संचालित डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर, येथील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे जागतिक पर्यावरण दिवसानिमित्याने दिनांक ०६/०६/२०१८ रोज गुरुवारला महाविद्यालयाच्या सिद्धार्थ सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.चंद्रशेखर पाटील व्याख्याते व अध्यक्ष रासेयो चे प्रा.डॉ.नरेंद्र बागडे कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ.चन्द्रशेखर पाटील यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाला रासेयोचे चे स्वयंसेवक व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



जागतिक पर्यावरण दिवस निमित्ताने रा से यो. स्वंयसेवक वृक्षारोपण करतांना

## जागतिक योग दिवस

पीडब्ल्यूएस सोसायटी द्वारा संचालित डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर, येथील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे जागतिक योग दिवसानिमित्याने दिनांक२१ /०६/२०१८ रोज गुरुवारला महाविद्यालयाच्या सिद्धार्थ सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.मिथिलेश अवस्थी यांच्याद्वारे योग प्रात्यक्षिक करून योग दिवस साजरा करण्यात आला.

या योगदिवसाच्या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यशवंत पाटील अध्यक्षस्थानी होते. या योग दिनानिमित्य योग प्रशिक्षक डॉ. मिथिलेश अवस्थी यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना योगाचे धडे देऊन त्यांच्याकडून योगाचे प्रात्याक्षिके करवून घेतली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ यशवंत पाटील यांनी आपल्या जीवनात योगाचे शारीरिकदृष्टया महत्व कसे आहे. असे योग विषयक विचार आपल्या अध्यक्षीय भाषणातून मांडले. याप्रसंगी रासेयो चे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.




महाविद्यालयात योग दिवस साजरा करतांना



## महाविद्यालयीन परिसरात वृक्षरोपण कार्यक्रम

पीडब्ल्यूएस सोसायटी द्वारा संचालित डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर, येथील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे संस्थेच्या सुवर्ण महोत्सवा निमित्याने दिनांक १५/०८/२०१८ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षरोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष मा. लांजेवार साहेब यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्व समजवून सांगितले.

आपल्या घरच्या परिसरात प्रत्येकांनी एक वृक्ष लावून त्यांचे संगोपन करावे असे महविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र बागडे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. मनीषा नागपुरे, विद्यार्थी प्रतिनिधी स्वप्नील धांडे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व रासेयोचे स्वंयसेवक उपस्थित होते.



महाविद्यालयातील स्वच्छता आणि नंतर वृक्षारोपणाचा कार्यक्रम

## स्वच्छता जनजागृती अभियान

दिनांक ०१/०९/२०१८ ला नागपूर महानगर पालिकेतील स्वच्छता अधिकारी यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वच्छता अभियानअंतर्गत नागपूर जिल्ह्याकरिता SSB-18 अँप संदर्भात माहिती देऊन विद्यार्थांना प्रत्यक्ष अँप डाऊनलोड करून माहिती पाठविण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र बागडे व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीषा नागपुरे उपस्थित होते.




स्वच्छता अभियान रैली डॉ. भाऊवायवार



# दिगविजय दिवस कार्यक्रम

स्वामी विवेकानंद यांनी अमेरिकेतील शोकागो येथे जागतिक सर्वधर्मपरिषदे मध्ये ११ सप्टेंबर १८९३ रोजी भारतीय हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करतांना ऐतिहास भाषण केले. आज यांच्या या ऐतिहासिक भाषणाला १२५ वर्ष पूर्ण झाले आहेत. रातुम नागपूर विद्यापीठाने विवेकानंदाच्या या ऐतिहासिक भाषणाला १२५ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्याने परिपत्रक काढून 'दिग्विजय दिवस' साजरा करण्याचे सर्व महाविद्यालयांना निर्देश दिले. त्या अंतर्गत डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर येथे दिनांक १२ सप्टेंबर २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता 'दिगविजय दिवस' कार्यक्रम साजरा करण्यात आला.

प्रस्तुत कार्यक्रमाची सुरवात विवेकानंदाच्या ऐतिहासिक भाषणांचे सामुहिक वाचनाने झाली. कार्यक्रमाकरिता प्रमुख व्यक्ते म्हणून डॉ. बबन मेश्राम एन.एम.डी कॉलेज गोंदिया म्हणून लाभले. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख व्यक्ते डॉ.बबन मेश्राम यांनी स्वामी विवेकानंद यांच्या ऐतिहासिक भाषणाचे सम्यक विश्लेषण करून त्यांच्या विचारावर प्रकाश टाकला. सहनशील, मानवता, सहिष्णुता, सत्य इत्यादी मानवीय मुल्यांचा सर विवेकानंद यांच्या भाषणात समाविष्ट आहे अशा प्रकारचे विचार त्यांनी विद्यार्थांना उपदेश देऊन केले.

प्रस्तुत कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, कर्मचारी व रासेयो चे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस

दर वर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा पी.डब्ल्यू.एस महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २४ सप्टेंबर २०१८ ला महाविद्यालयाच्या सिद्धार्थ सभागृहात राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख व्यक्ते म्हणून रातुम नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी समन्वयक डॉ. भाऊ दायदार उपस्थित होते. त्यांनी रासेयोच्या स्वंयसेवकांना रासेयोची स्थापना, उद्धिष्ट आणि त्याचे महत्व समजवून सांगितले.

आपल्या अध्यक्षीय स्थानावरून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यशवंत पाटील यांनी रासेयोच्या स्वंयसेवकांच्या शिस्तपालनाचे कौतूक करत त्यांना आयुष्यात येणाऱ्या अडचणीचा सामना करण्यास मंगल कामना केली. सोबतच मंचावर डॉ. अमोल मेंढे, डॉ.सुमेध नागदेवे, डॉ.मनीषा नागपुरे कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र बागडे व विद्यार्थी प्रतिनिधी स्वप्नील धांडे व स्वंयसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## गांधी जयंती व स्वच्छता पंधरवाडा समारोपीय कार्यक्रम

दिनांक २ आक्टोबर २०१८ रोजी महात्मा गांधी जयंतीच्या निमित्याने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यशवंत पाटील यांनी स्वच्छता अभियानाच्या संदर्भात महामानवाची भूमिका या विषयांवर विद्यार्थांना मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता अभियान, गाजर गवत निर्मुलन व प्लास्टिक निर्मुलन अभियान राबविण्यात आले.

याप्रंसगी कनिष्ट महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.प्रशांत झोडे, रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र बागडे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ.मनीषा नागपुरे, विद्यार्थी प्रतिनिधी स्वप्नील धांडे, सिमरन रहाटे व इतर रासेयोचे स्वयंसेवक व महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.



गांधी जयंती पंधरवाडा निमित्त कार्यक्रमाचे आयोजन



## धम्म संदेश

दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमी येथे धम्म संदेश हा कार्यक्रम दि. १८/१०/२०१८ रोजी घेण्यात आला. सन २०११ ला तत्कालीन उपजिल्हाधिकारी वाघमारे साहेब व रातुम नागपूर विद्यापीठातील डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे प्रमुख डॉ. प्रदीप आगलावे यांच्या पुढाकाराने दरवर्षी दीक्षाभूमीवर महविद्यालयीन व इतर सामाजिक संस्थेद्वारे विविध सांस्कृतिक व सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविले जातात. यातून बौद्ध धम्माची शिकवण व तथागत गौतम बुद्धांचा संदेश जगात पोहचविण्यास मदत होत असते.

या वर्षी आमच्या महाविद्यालयातील एकूण २४ मुलांनी या कार्यक्रमात भाग घेतला होता. २४ विद्यार्थी २ टीम मध्ये विभागले गेले होते. पथनाटयाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करून विद्यार्थ्यांनी दीक्षाभूमीवर येणाऱ्या जनतेला बुद्ध, फुले, शाहू यांच्या विचारांची शिदोरी देण्याचे काम केले. अशाच प्रकारे नागपुरातील जवळपास ५० महाविद्यालयातील एकूण २०० ते २५० विद्यार्थी या उपक्रमात भाग घेतात. हातात विविध प्रकारचे फलक हातात घेऊन उभे असतात, ज्यावर सुंदर असे महापुरुषांचे विचार लिहिले असतात.

'धम्म संदेश' हा कार्यक्रमातून समाजात महापुरुषांचे आचार-विचार पेरण्याचे काम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून केले जात आहे. सदर कार्यक्रमाला महविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र बागडे व सहकार्यक्रम अधिकारी डॉ.मनीषा नागपुरे यांनी उत्तम कामगिरी बजाविली.




विजयादशमी / डॉ. बाबासाहेब आंबेडकर-दिक्षाभूमीवर धम्मसंदेश कार्यक्रम
माजी कुलगुरु प्रा. मोटे आसाम विद्यापीठ

## संविधान दिवस

पीडब्ल्यूएस सोसायटी द्वारा संचालित डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर, येथील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे संविधान दिवसानिमित्याने दिनांक २६/११/२०१८ रोज गुरुवारला महाविद्यालयाच्या सिद्धार्थ सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विचारपिठावर कार्यक्रमाचे मुख्य वक्ते म्हणून महविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.विमल राठोड तर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.यशवंत पाटील, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र बागडे सहकार्यक्रम अधिकारी डॉ.मनीषा नागपुरे, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून स्वप्नील धांडे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. विमल राठोड म्हणाल्या ‘प्रत्येक देशाच्या संविधानात काही निश्चित उद्दिष्टे असतात, त्या उद्धीष्टांचा त्या देशाच्या संविधानाच्या  प्रस्तावनेत उल्लेख केलेला असतो. लिखित स्वरूपाच्या संविधानात त्या देशातील भविष्याच्या वाटचालीचा आलेख रेखाटलेला असतो. भारतीय घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संविधानात अनेक महानपरुषाना डोळयासमोर ठेऊन संविधानाची निर्मिती केली. संविधानाचा आशय स्पष्ट होण्याचा दृष्टीने उपयुक्त ठरेल अशी प्रस्तविका संविधानाच्या सुरवातीला जोडली आहे. या प्रस्ताविकेलाच संविधानाचा प्राण किंवा आत्मा म्हटले जाते.’

अध्यक्षीय भाषणात डॉ.यशवंत पाटील यांनी संविधानात दिलेले अधिकार व कर्तव्ये यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.सुशांत चिमणकर यांनी केले. तर आभार विद्यार्थी प्रतिनिधी स्वप्नील धांडे यांनी मानले. याप्रसंगी रासेयोचे स्वंयसेवक व महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## बेटी बचावो बेटी पढावो जनजागृती रॅली

पीडब्ल्यूएस सोसायटी द्वारा संचालित डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर, येथील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्याने दिनांक ०३/०१/२०१९ रोजी महाविद्यालयाच्या सिद्धार्थ सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विचारपिठावर कार्यक्रमाचे मुख्य वक्ते म्हणून महविद्यालयातील रासेयोच्या सहकार्यक्रम अधिकारी डॉ.मनीषा नागपुरे तर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.यशवंत पाटील, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र बागडे, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून स्वप्नील धांडे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाला स्त्री शक्तीवर आधारित एक नाटिका सादर करण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांद्वारे बेटी बचाव बेटी पढावो जनजागृती रॅली चे आयोजन करण्यात आले होते. जनजागृती रॅली इंदोरा, जरीपटका भागात काढण्यात आली होती. यादरम्यान विद्यार्थ्यांनी हातात स्त्रीशक्तीवर आधारित फलक घेऊन जयघोष करीत सभोवतालचा परिसर दुमदुमून सोडला. वरील कार्यक्रमाला महविद्यालयातील सर्व विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.




जनजागृती रॅलीत महाविद्यालयाचे विद्यार्थी
'Rally for women' "बेटी बचाओ बेटी पढाओ"

## भव्य रक्तदान शिबीर आणि सिकलसेल चाचणी शिबीर

पीडब्ल्यूएस सोसायटी द्वारा संचालित डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर, येथील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे संस्थेचे अध्यक्ष डॉ.मधुकररावजी वासनिक यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्याने महाविद्यालयात भव्य रक्तदान व सिकलसेल चाचणीचे शिबीर आयोजित करण्यात आले होते. विशेष म्हणजे आमच्या संस्थेचे अध्यक्ष हे स्वत: हुद्याने वैद्यकीय सेवेत तरबेज व शासकीय मेडिकल कॉलेज येथे अधिष्टाता पदावर बरेच वर्ष रहिले आहेत.

त्यांनी दलित, शोषित, पिडीत लोकांची आपल्या पेशाच्या माध्यमातून सेवा केली. आणि त्याचीच एक परतफेड किंवा समाजऋण फेडण्याचे काम गेली अनेक वर्षापासून आमचे महाविद्यालय करीत आहे. ती त्यांची जन्मदिनी भव्य रक्तदान शिबिराचे व सिकलसेल चाचणी शिबिरांचे आयोजन करून आरोग्य सेवेत आपले अमुल्य योगदान देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या वर्षीच्या शिबिरात एकूण ४५ विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान केले. स्वप्नील धांडे, आकाश राव, अनंत सोमकुवर, सावन रामटेके, रत्नदीप गणवीर, शिवानी पाटील, पायला मेश्राम इत्यादी रासेयोच्या स्वयंसेवकांनी कार्यक्रमाच्या आयोजन यशस्वी केली.



दि २३ जानेवारी २०१८ रोजी डॉ मधुकररावजी वासनिक यांच्या जन्मदिवसानिमित्य महाविद्यालयात रक्तदान, सिकलसेल तपासणी कार्यक्रम.

**स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत**
**राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर**
**डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर**
**व**
**पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर**
**यांच्या संयुक्त विद्यमाने**

**"स्वच्छ व निर्मल भारतासाठी युवकांचे योगदान"**

डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने "स्वच्छ व निर्मल भारतासाठी युवकांचे योगदान" या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय सेवा योजना शिबीर संजीवन वृद्धाश्रम, आमगांव (देवळी) ता. हिंगणा, जिल्हा – नागपूर येथे **दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ ते ०५ मार्च २०१९** या कालावधीत संपन्न झाला. या सात दिवशीय शिबिराचे उद्धाटन मा. रमेशचंद्र बंग, माजी मंत्री (महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते, व प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि डॉ.मोहन काशीकर (पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख, रातुम नागपूर विद्यापीठ नागपुर), डॉ.नरेंद्र राठोड, प्राचार्य (प्रशासकीय सेवा पदवी महाविद्यालय नागपूर) सौ.शेरकुरे, सरपंचा, नागझरी गट ग्राम पंचायत, श्री. गोमासे साहेब, व्यवस्थापक संजीवनी वृद्धाश्रम आमगांव (देवळी) यांच्या उपस्थितीत पार पडले.

या सात दिवशीय शिबिरात **'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे'** ही सानेगुरुजीची प्रार्थना दररोज सकाळी घेऊन वृद्धाश्रमातील श्री. गोमासे, व्यवस्थापक यांनी स्वयंसेवकाकडून योगासनाच्या कवायती करवून घेतल्या. स्वयंसेवकानी वृद्धाश्रमाच्या परिसरात स्वच्छता, नालेसफाई, झाडांना आडे, वृक्ष संवर्धन इत्यादी कामे केली. झाडे लावण्यासाठी खडयाचे खोदकाम सुद्धा केले.

**दिनांक १ मार्च २०१९ रोजी,** दुपारच्या सत्रात व्याखाना करिता डॉ,विकास जांभूळकर, राज्यशास्त्र विभाग तथा संचालक बार्टी पुणे स्पर्धा परीक्षा केंद्र रातुम नागपूर विद्यापीठ नागपूर यांनी 'स्पर्धा परीक्षेची तयारी करतांना' या विषयांवर मार्गदर्शन केले. या सत्राच्या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी कु.प्रगती बोरकर या स्वयंसेविकेकडे दिली होती. तिने यशस्वीरित्या कार्यक्रम पार पाडला.

**दिनांक २ मार्च २०१९ रोजी,** डॉ. शैलेन्द्र लेंडे मराठी विभाग प्रमुख रातुम नागपूर विद्यापीठ नागपूर यांनी 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि आजची युवा पिढी' यावर सखोल मार्गदर्शन केले. व तत्कालीन परिस्थिती व सरकारच्या ध्येय धोरणावर प्रकाश टाकून युवा पिढीला सजक्तेचा इशारा दिला. या सत्राच्या कार्यक्रमाची

संपूर्ण जबाबदारी कु. शिवानी पाटील या स्वयंसेविकेकडे दिली होती. तिने यशस्वीरित्या कार्यक्रम पार पाडला.

**दिनांक ३ मार्च २०१९ रोजी,** डॉ. बबन मेश्राम, समाजशास्त्र विभाग प्रमुख एन. एम. डी. कॉलेज गोंदिया यांनी 'भारतीय राजकारणात युवा पिढीचे योगदान' यावर सखोल मार्गदर्शन केले. आजच्या राजकारणात युवा वर्गाने मोठ्या संख्यने सहभाग घेऊन देशांचे नेतृत्व करावे, अशा प्रकारचे वक्तव्य प्रमुख पाहुण्यांनी केले. या सत्राच्या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी विकेश तिमांडे या स्वयंसेवकाकडे दिली होती. त्याने यशस्वीरित्या कार्यक्रम पार पाडला.

**दिनांक ४ मार्च २०१९ रोजी,** डॉ. मिली बेबी, मानसशास्त्र विभाग प्रमुख, व.ना.शास.कला व समाजविज्ञान संस्था नागपूर तसेच डॉ. कपिल सिंघेल, इंग्रजी विभाग प्रमुख, व.ना.शास.कला व समाजविज्ञान संस्था नागपूर यांनी 'मानसशास्त्रीय दृष्टीकोन आणि युवा पिढी' ' यावर स्वयंसेवकांना मौलाचे मार्गदर्शन केले. आजच्या युगात युवा वर्ग आपले मानसिक संतुलन बिघडवीत जात आहे, त्याला वेगवेगळे शौक लागले असतांना यातून बाहेर पडण्यासाठी मानसशास्त्रीय दृष्टकोनाची आवश्यकता विशद केली. सर्वांनी या व्याखानाचे जोरदार समर्थन करत, भविष्यात वाईट कृत्य, मार्ग, सवयी त्यागणार अशी सामुहिक शपथ घेतली. या सत्राच्या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी सागर कोहचाडे या स्वयंसेवकाकडे दिली होती. त्याने यशस्वीरित्या कार्यक्रम पार पाडला.

दररोज संध्याकाळच्या सांस्कृतिक कार्यक्रमात एकल नृत्य, समूहनृत्य, एकपात्री प्रयोग, एकांकिका, व्यसनमुक्ती व स्वच्छतावर आधारित कार्यक्रम, गीतगायन, राष्ट्रीय गीते, चारोळ्या, ओव्या इत्यादी रंगारंग कार्यक्रमात भाग घेऊन आपल्या अंगातील कलागुणांचे प्रदर्शन केले.

**दिनांक ५ मार्च २०१९ ला सकाळी समारोपीय कार्यक्रम**

समारोपीय कार्यक्रमाला डॉ. मोहन काशीकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, रातुम नागपूर विद्यापीठ नागपूर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर अध्यक्ष म्हणून पी.डब्ल्यू. एस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील उपस्थित होते. त्याचप्रमाणे सौ. उज्ज्वलाताई बोढारे, जिल्हा परिषद सदस्य नागपूर, मा.श्री. कवडूजी भोयर, सरपंच आमगांव (देवळी), मा. श्री. गोमासे साहेब, व्यवस्थापक, संजीवनी वृद्धाश्रम आमगांव (देवळी) इत्यादी मान्यवराच्या उपस्थितीत समारोपीय कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी सौ. उज्ज्वलाताई बोडारे यांनी शिबिरातून विद्यार्थ्यामध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजते व देशाविषयी देश प्रेम निर्माण होते. श्री. कवडूजी भोयर यांनी आजच्या युवा वर्गाचे इन्टरनेटच्या माध्यमातून ज्ञान अर्जित करावे, त्यातूनच आजच्या युवा वर्ग नाव भारत घडवू शकतो असे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मनीषा नागपुरे सहकार्यक्रम अधिकारी यांनी केले. तर शिबिरात सात दिवस पार पडलेल्या घडणाकर्माचे

अहवाल वाचन डॉ. नरेंद्र बागडे यांनी केले. या शिबिरात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्वयं सेवकांना बक्षिसे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी प्रतिनिधी स्वनिल धांडे यांनी करून सर्वांचे आभार व्यक्त केले. या शिबिरात दोन्ही महाविद्यातील एकूण १३० स्वंयसेवकांनी सहभाग घेतला.




विशेष शिबिर उद्घाटन प्रसंगी रा.से.यो चे विद्यापीठ समन्वयक डॉ. केशव वाळके यांचे स्वागत करतांना डॉ. नरेंद्र बागडे रा.से.यो कार्य. अधिकारी




विशेष शिबिर उद्घाटनाच्या कार्यक्रमात माजी मंत्री. रमेश बंग समवेत प्राचार्य डॉ. यशवंत पाटिल व डॉ. केशव वाळके




विशेष शिबीर प्रसंगी उद्घाटन करतांना माजी मंत्री रमेश बंग साहेब
व मंचावर इतर मान्यवर




विशेष शिबीर उद्घाटन प्रसंगी रा.से.यो चे स्वयंसेवक आणी
प्रमुख मान्यवर




शिबीराच्या बौद्धीक सत्रात स्पर्धा परीक्षेची तयारी करतांना डॉ. विकास जांभूळकर




विशेष शिबीराच्या बौद्धीक सत्रात राजकारणात युवकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शक व प्रमुख वक्ता डॉ. बबन मेश्राम यांचे स्वागत करतांना अमित गौर




विशेष शिबीरात औपचारीक भेटी दरम्यान मार्गदर्शन करतांना
रा. तु. म. नागपूर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख
डॉ. मोहन काशीकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना.




विशेष शिबीरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना संघपाल
श्री. सौंदर्य वाणी.




विशेष शिबीरात मानसशास्त्रीय दृष्टीकोन आणि युवा पिढी या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. मिली बोबी, मानसशास्त्र विभाग प्रमुख व.ना. शासकीय समाजविज्ञान संस्था नागपूर.




विशेष शिबीरात विद्यार्थ्यांचा कामाचा आढावा घेतांना डॉ. नरेंद्र बागडे रा.से.यो विभागाचे समन्वयक, डॉ. सुदेश भोवते.



विशेष शिबीरात व्याखानाचा आस्वाद घेतांना रा.से.यो चे स्वयंसेवक




विशेष शिबीरात अभीव्यक्ती व स्वातंत्र आणी आजची युवा पीढी या विषयावर व्याखाना दरम्यान प्रास्ताविक भाषण करतांना डॉ. मनीषा नागपुरे. रा.से.यो सहायक कार्यक्रम अधीकारी



विशेष शिबीरात परीसर स्वच्छ करतांना रा.से.यो स्वयंसेवक




विशेष शिबीरच्या सांस्कृतीक कार्यक्रमाचे निरीक्षक श्री. गोमासे साहेब
श्री. स्वप्नील धोटे. यांचे स्वागत करतांना रा.से.यो चे स्वयंसेविका




विशेष शिबीराच्या समारोपीय कार्यक्रमात हिंगणा तहसील येथील तहसीलदार श्री. वाघमारे साहेब आणि मंचावर इतर मान्यवर।




विशेष शिबीरात आयोजीत केलेल्या युवा संसद या कार्यक्रमात सहभागी स्वयंसेवक.




सांस्कृतिक कार्यक्रमाच्या प्रसंगी एकदान




सांस्कृतिक कार्यक्रमाच्या प्रसंगी एकदान



शिबिराचा समारोप बक्षिस / Medal वितरण




शिबिराचा समारोप बक्षिस/Medal वितरण